# महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित

महावितरण

प्रकाशगड, प्लॉट क्र. जी–९, वांद्रे (पूर्व), मुंबई – ४०००५१. संकेतस्थळ : www.mahadiscom.in

## जाहीर सूचना

**महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित (महावितरण) च्या दिनांक १ सप्टेंबर, २०१३ ते २८ फेब्रुवारी, २०१४ या कालावधीकरीता क्रॉस सबसिडी अधिभाराचे पुनर्निर्धारण करण्यासाठीच्या याचिकेवर सूचना / हरकती / अभिप्राय मागविण्याकरीता.**

**(प्र. क्र. १७/२०१५)**

**१.** मा. आयोगाच्या प्रकरण क्र. १०७/२०१३ मधील दिनांक २९ ऑक्टोबर २०१३ रोजीच्या आदेशा अन्वये महावितरण कंपनीस दिनांक ०१ सप्टेंबर २०१३ ते २८ फेब्रुवारी २०१४ या कालावधीमध्ये क्रॉस सबसिडी अधिभार वसूल करण्याची परवानगी दिली होती. सदर आदेशातील क्रॉस सबसिडी अधिभार हा म.वि.नि.आ. यांच्या प्र.क्र. ९५/२०१५ मधील दिनांक ०५.०९.२०१३ रोजीच्या आदेशा नुसार लागू झालेल्या अतिरीक्त आकाराच्या वसुलीमुळे (अतिरीक्त वीज आकार–१ व अतिरीक्त वीज आकार–२) ग्राहकाच्या सरासरी देयक आकारामध्ये वाढ झाल्यामुळे निर्धारित करण्यात आला होता. वरील दिनांक २९.१०.२०१३ रोजीच्या आदेशा विरूद्ध अपिलीय प्राधिकरणाकडे आव्हान याचिका दाखल करण्यात आल्या होत्या. अपिलीय प्राधिकरणाने त्यांच्या दि. ११.०९.२०१४ (अपील क्र. २३ आणि ६५/२०१४) रोजीच्या आदेशानुसार संबंधीत प्रकरणे राज्य आयोगाकडे क्रॉस सबसिडी अधिभार पुनर्निर्धारणासाठी वर्ग केली आणि याचिकाकर्त्यांना वसूल केलेल्या क्रॉस सबसिडी अधिभाराच्या परताव्या करीता महावितरणकडे अर्ज करण्याची परवानगी दिली.

**२.** अपिलीय प्राधिकरणाच्या आदेशानुसार दिनांक ०९ जानेवारी २०१५ रोजी महावितरणने राज्य आयोगाकडे दिनांक ०१ सप्टेंबर २०१३ ते २८ फेब्रुवारी २०१४ या कालावधीतील क्रॉस सबसिडी अधिभार निर्धारित करण्याकरीता याचिका क्र. १७/२०१५ दाखल केलेली आहे. दिनांक ०१ सप्टेंबर २०१३ ते २८ फेब्रुवारी २०१४ या कालावधीमध्ये अतिरिक्त वीज आकार वसूलीला (अतिरीक्त वीज आकार–१,२,३ व ४ तसेच इंधन समायोजन आकार) परवानगी दिल्यामुळे ग्राहकाच्या सरासरी देयक आकारामध्ये झालेल्या वाढीमुळे क्रॉस सबसिडी अधिभार पुनर्निर्धारीत करण्यात यावा अशी महावितरणने विनंती केली आहे. ग्राहक वर्गवारीनुसार अंदाजित क्रॉस सबसिडी अधिभार तक्ता क्र. 'अ' मध्ये दिलेला आहे. दिनांक ३१.०५.२०१६ रोजी झालेल्या सुनावणीमध्ये मा. आयोगाने सदर याचिकेबाबत जाहीर सुनावणी घेण्याचा निर्णय घेतलेला आहे.

**३.** तक्ता क्र. अ : अंदाजित क्रॉस सबसिडी अधिभार : (साठी ०१.०९.२०१३ ते २८.०२.२०१४)

| अ. क्र. | वर्गवारी | उपवर्गवारी | अंदाजित क्रॉस सबसिडी अधिभार (रू. प्रति युनिट) — वीज पुरवठा करणाऱ्या वाहिनीचा विद्युत दाब | | |
|---|---|---|---|---|---|
| | | | अतिउच्चदाब | ३३ केव्ही | २२/११ केव्ही |
| १ | औद्योगिक | एक्सप्रेस फिडर | ३.२३ | २.७८ | २.१३ |
| | | नॉन एक्सप्रेस फिडर | २.७१ | २.२७ | १.६१ |
| | | हंगामी उद्योग | ४.६८ | ४.२३ | ३.५८ |
| २ | वाणिज्यिक (एक्सप्रेस) | इतर | ७.९५ | ७.५० | ६.८५ |
| | वाणिज्यिक (नॉन एक्सप्रेस) | इतर | ७.२० | ६.७५ | ६.०९ |
| ३ | रेल्वे | | ३.४० | २.९६ | २.३० |

**४.** वरील क्रॉस सबसिडी अधिभार हा दि. ०१ सप्टेंबर २०१३ ते २८ फेब्रुवारी २०१४ या कालावधीतील मुक्त प्रवेश ग्राहकांकरीता लागू राहील.

**५.** महावितरण कंपनीच्या याचिका क्र. १७/२०१५ ची प्रत खाली नमूद केलेल्या कार्यालयांत लेखी विनंती अर्ज केल्यास मिळू शकेल.

**मुख्य कार्यालय**
**मुख्य अभियंता (वाणिज्य)**
महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित,
५ वा मजला, प्रकाशगड, प्लॉट क्र. जी–९, वांद्रे (पूर्व), मुंबई–४०० ०५१.
दूरध्वनी क्र. ०२२–२६४७४७५३ (वै.), २६४७४२११ (कार्या.)
ई–मेल : cecomm@mahadiscom.in; cecommho@gmail.com

**क्षेत्रीय कार्यालये :**

| | |
|---|---|
| १. मुख्य अभियंता (सं व सु., ) मराविविकंम, भांडुप शहर परिमंडल, १ ला मजला, एशिअन पेंट जवळ, एल.बी.एस.मार्ग भांडुप (प) मुंबई – ४०० ०७८. एसटीडी कोड : ०२२, दूरध्वनी क्र.: २५६६०६५२ (वै), २५६६३९८४ (का), फॅक्स : २५६६३९९० ई–मेल : cebhandup@mahadiscom.in | २. मुख्य अभियंता (सं व सु., ) मराविविकंम, औरंगाबाद परिमंडल, विद्युत भवन, डॉ.बाबासाहेब आंबेडकर मार्ग, औरंगाबाद – ४३१००१. एसटीडी कोड : ०२४०, दूरध्वनी क्र : २३३१३४७ (वै.), २३३४०६५ (का), फॅक्स : २३३१०५६, ई–मेल : ceaurangabad@mahadiscom.in |
| ३. मुख्य अभियंता (सं व सु.,) मराविविकंम, अमरावती परिमंडल,विद्युत भवन,शिवाजी नगर,कॅम्प एरिया, अमरावती–४४४६०२, एसडीटी कोड : ०७२१, दूरध्वनी क्र. २५५११६८ (वै), २५५११५७ (का), ई–मेल : ceamravati@mahadiscom.in | ४. मुख्य अभियंता, (सं व सु.,) मराविविकंम, नागपूर परिमंडल, विद्युत भवन, काटोल रोड, नागपूर – ४४००१३ एसटीडी कोड : ०७१२, दूरध्वनी क्र. : २५३२१४२ (वै), २५३१५६१ (का), फॅक्स : २५२०१७८ ई–मेल : cenagpururban@mahadiscom.in |
| ५. मुख्य अभियंता, (सं व सु.,) मराविविकंम, नाशिक परिमंडल, विद्युत भवन, बिटको पॉईंट, नाशिकरोड, नाशिक ४२२ १०१. एसटीडी कोड : ०२५३, दूरध्वनी क्र. : २४६१७६७ (वै), २४६२४९१, (का), फॅक्स : २४६१५८१ ई–मेल : cenashik@mahadiscom.in | ६. मुख्य अभियंता, (सं व सु.,) मराविविकंम, प्रशासकीय इमारत, पुणे परिमंडल, पॉवरहाऊस, रास्तापेठ, पुणे ४११०११ एसटीडी कोड : ०२०, दूरध्वनी क्र.: २६०६५७४० (वै), २६१३१३८९, (का), फॅक्स : २६१३२०५२, ई–मेल : cepuneurban@mahadiscom.in |
| ७. मुख्य अभियंता (सं व सु.,) मराविविकंम. अकोला परिमंडल, विद्युत भवन, रतनलाल प्लॉट, अकोला ४४४००५ एसटीडी कोड : ०७२४, दूरध्वनी क्र.: २४३४७४० (वै), २४३४४७६ (का), ई–मेल : ceakola@mahadiscom.in | ८. मुख्य अभियंता (सं व सु), मराविविकंम, कल्याण परिमंडल, तेजश्री, जहांगीर मैदान, कर्णिक रोड, कल्याण – ४२१३०१. एसटीडी कोड : ०२५१, दूरध्वनी क्र. : २३०५९६० (वै), २३२८२८३ (का), फॅक्स:२३२९४८८, ई–मेल : cekalyan@mahadiscom.in |
| ९. मुख्य अभियंता (सं व सु), मराविविकंम, कोकण परिमंडल, नवीन प्रशासकीय इमारत, १ ला मजला, नाचणे रोड, रत्नागिरी ४१५६३९, एसटीडी कोड : ०२३५२, दूरध्वनी क्र.: २२५८५२ (वै), २७१००३ (का), फॅक्स : २२६५०४ ई–मेल – cekonkan@mahadiscom.in | १०. मुख्य अभियंता (सं व सु., ) मराविविकंम, कोल्हापूर परिमंडल, प्रशासकीय इमारत, ताराबाई पार्क, कोल्हापूर ४१६००३, एसटीडी कोड : ०२३१, दूरध्वनी क्र. : २६५३५८३ (वै), २६५०५८१ (का), फॅक्स : २६५८०६०, ई–मेल : cekolhapur@mahadiscom.in |
| ११. मुख्य अभियंता (सं व सु.,) मराविविकंम, लातूर परिमंडल, जुने विद्युत गृह, साळे गल्ली, लातूर – ४१३५१२, एसटीडी कोड : ०२३८२, दूरध्वनी क्र. : २५३३४४ (वै), २५३८६६ (का), फॅक्स : २५१८६६, ई–मेल – celatur@mahadiscom.in | १२. मुख्य अभियंता (सं व सु), मराविविकंम, जळगांव परिमंडल, विद्युत भवन, जुनी एमआयडीसी, अजिंठा रोड, जळगांव – ४२५००३. एसटीडी कोड : ०२५७ दूरध्वनी क्र : २२७२९१७ (वै), २२७२९९० (का), फॅक्स २२१२२७२, ई–मेल cejalgaon@mahadiscom.in |
| १३. मुख्य अभियंता (सं व सु.,) मराविविकंम, नांदेड परिमंडल, विद्युत भवन, अण्णाभाऊ साठे चौक, नांदेड – ४३१६०२ एसटीडी कोड : ०२४६२, दूरध्वनी क्र : २८६८०१ (वै), २८६८०३ (का), फॅक्स : २८६८०४, ई–मेल : cenanded@mahadiscom.in | १४. मुख्य अभियंता (सं व सु), मराविविकंम, बारामती परिमंडल, ३ रा मजला, उर्जा भवन, भिगवन रोड, बारामती – ४१३१०२, एसटीडी कोड : ०२११२, दूरध्वनी क्र. : २४४७७१ (वै), २४४७७२ (का), फॅक्स : २४४७७३ ई–मेल cebaramati@mahadiscom.in |
| १५. मुख्य अभियंता (सं व सु), मराविविकंम, गोंदिया परिमंडल, जुने पॉवर हाऊस, राम नगर, गोंदिया – ४४१६०१ एसटीडी कोड : ०७१८२, दूरध्वनी क्र. : २५३२४४ (वै), २५३२४५ (का), ई–मेल : cegondia@mahadiscom.in | १६. मुख्य अभियंता (सं व सु), मराविविकंम, चंद्रपूर परिमंडल, बाबू पेठ, चंद्रपूर – ४४२४०३, एसटीडी कोड : ०७१७२, दूरध्वनी क्र. : २२७४११ (का), ई–मेल : cechandrapur@mahadiscom.in |

**६.** महावितरण कंपनीने या जाहिर सूचनेद्वारे उक्त विनंती अर्जासंबंधात जनतेकडून सूचना/हरकती/अभिप्राय मागवाव्यात असे मा.आयोगाचे निर्देश आहेत. जनतेने आपल्या सूचना/हरकती/अभिप्राय सचिव, महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग, १३ वा मजला, सेंटर क्र.१, वर्ल्ड ट्रेड सेंटर, कफ परेड मुंबई – ४०० ००५ (फॅक्स : २२१६३९७६, ई–मेल : mercindia@merc.gov.in) या पत्त्यावर बुधवार दिनांक ६ जुलै २०१६ पर्यंत मिळतील अशा बेताने पाठवाव्यात. या सोबत सूचना/हरकती/अभिप्राय यांची एक प्रत अर्जदार म्हणजे मुख्य अभियंता (वाणिज्य), प्लॉट नं. जी–९, प्रकाशगड, प्रोफेसर अनंत काणेकर मार्ग, बांद्रा (पुर्व), मुंबई – ४०० ०५१ (फॅक्स : ०२२२६४७५०१२, ई–मेल : cecomm@mahadiscom.in) यांना पाठविल्याचा पुरावा जोडण्यात यावा. सूचना/हरकती/अभिप्राय दाखल करु इच्छिणाऱ्या प्रत्येक व्यक्तीने इंग्रजी किंवा मराठी भाषेतील सहा प्रती, त्यावर प्रेषकाचे संपूर्ण नांव, टपालाचा पत्ता, असल्यास ई–मेल पत्ता यांसहित पाठवाव्यात. एखाद्या ग्राहक संघटनेच्या वतीने अथवा ग्राहक वर्गवारीच्या वतीने हरकती दाखल करण्यात येत असल्यास तसे स्पष्ट नमूद करावे. प्रेषकास आयोगापुढील जाहीर सुनावणीस व्यक्तिशः उपस्थित राहण्याची इच्छा असल्यास तेही नमूद करावे. अशा व्यक्तीस मा.आयोगाकडून खालील ठिकाणी घेण्यात येणाऱ्या जाहीर सुनावणीस उपस्थित राहण्याची संधी देण्यात येईल व त्याकरीता निराळी सूचना दिली जाणार नाही.

| अ.क्र. | सार्वजनिक सुनावणीचे स्थळ | वेळ (सकाळी) | सुनावणीची तारीख |
|---|---|---|---|
| १ | **अमरावती** हॉल नं.१, विभागीय महसुल आयुक्त यांचे कार्यालय, कॅम्प परिसर, अमरावती जि.अमरावती | १०.०० | ११ जुलै, २०१६ (सोमवार) |
| २ | **नागपूर** वानामती हॉल, व्हीआयपी रोड, धरमपेठ, नागपूर, जिल्हा नागपूर | १०.०० | १३ जुलै, २०१६ (बुधवार) |
| ३ | **औरंगाबाद** मिटींग हॉल, विभागीय आयुक्तांचे कार्यालय, औरंगाबाद जिल्हा, औरंगाबाद | १०.०० | १८ जुलै, २०१६ (सोमवार) |
| ४ | **पुणे** कौन्सिल हॉल, विभागीय आयुक्तांचे कार्यालय, पुणे, जि.पुणे, पुणे. | १०.०० | २० जुलै, २०१६ (बुधवार) |
| ५ | **नाशिक** नियोजन भवन, जिल्हाधिकारी कार्यालय परिसर, जुना आग्रा रोड, नाशिक | १०.०० | २५ जुलै, २०१६ (सोमवार) |
| ६ | **नवी मुंबई** आगरी कोळी संस्कृती भवन, पाम बीच रोड, सेक्टर २४, नेरूळ, नवी मुंबई. | १०.०० | २८ जुलै, २०१६ (गुरुवार) |

**७.** बुधवार दिनांक ६ जुलै २०१६ पर्यंत प्राप्त झालेल्या प्रत्येक सूचना/हरकती/अभिप्राय यांना महावितरण कडून तीन दिवसात परंतु शनिवार दिनांक ९ जुलै, २०१६ पर्यंत उत्तरे देण्यात येतील. कंपनी तर्फे देण्यात आलेल्या उत्तरावर ग्राहक/आक्षेपक त्यांची प्रत्युत्तरे किंवा उत्तरे जाहीर सुनावणीच्या वेळी किंवा उशिरात उशिरा सोमवार दिनांक १ ऑगस्ट २०१६ पर्यंत दाखल करु शकतील.

**८.** सदर तपशीलवार याचिका महावितरणच्या **www.mahadiscom.in** या वेबसाईटवर उपलब्ध आहे. तसेच ही याचिका आयोगाची वेबसाईट **www.mercindia.org.in / www.merc.gov.in** वर डाऊनलोड करुन घेण्याच्या स्वरुपात (विनामुल्य) उपलब्ध आहे.

**सही/–**
**मुख्य अभियंता (वाणिज्य)**
**महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित**

**ठिकाण : मुंबई**
**दिनांक : १५.०६.२०१६**

**Revised RO No. 10052 Size 16 X 50 Pub 16.06.16**
**Punyanagari, All Editions**
**Astral Advertising, Nashik.**